# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/01/2023 (शुक्रवार) सकाळ

## चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :- अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील परमात्मा एक आश्रम पावडदौना शिवार येथे दिनांक २६/०१/२०२३ चे १३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे- गजानन भिवाजी लांजेवार, वय ३६ वर्ष, रा. बंगालीटोला ता. केनापूर जि. बालाघाट हा आपल्या परिवारासह परमात्मा एक आश्रम पावडदौना मौदा येथे दर्शन करण्याकरिता आला असता फिर्यादीच्या पॅटच्या मागच्या खिशातुन आरोपी नामे- १) पवन संदानंद गोंडाणे, वय ३५ वर्ष, रा. रमा नगर कामठी हा नगदी ५,२००/- रू. चोरी करतांनी दिसल्याने फिर्यादीने आरोपीचा हात पकडून चोर चोर म्हणुन ओरडल्याने आजु बाजुच्या लोकांनी आरोपीचे ईतर तिन साथीदार आरोपी नामे-२) अनिल भांकर वानखेडे, वय २७ वर्ष, रा. चिन्नज नगर कामठी ३) अमन नंदकुमार कांबळे, वय १९ वर्ष, रा. रमा नगर कामठी ४) विक्की उर्फ सोनू राजेश मानवटकर, वय ३२ वर्ष, रा. कामगार नगर कळमना रोड कामठी यांना पकडून त्यांना पोलीसांच्या ताब्यात देऊन त्यांची झडती घेतली असता त्यांचे कडुन नगदी ५,२००/- रू. मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भगवान चांदेवार बं. नं ४४२ मो. क्र. ९७६५२२१११६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :- अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा बिल्लोरी पाटनसावंगी ता. सावनेर येथे दिनांक २५/०१/२०२३ चे १७.३० वा. ते २६/०१/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- आनंद बल्लबदास काकणी, वय ४९ वर्ष, रा. प्लॅाट नं. १५ (अ) न्यु वर्मा ले आउट अंबाझरी नागपूर यांची बेल्लोरी ता. सावनेर शिवारातील शेती मधील वेचून ठेवलेल्या १० कापसाच्या गाठोडया पैकी ४ कापसाचे गाठोडे अंदाजे वजन १५० किलो किंमती अंदाजे १३,०००/- रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी चोरून नेलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे ब नं ११६१ पो.स्टे. सावनेर मो. क्र. ९८२२९३२२५३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**